मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-३/३६७/२०२६
दिनांक – स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

वाचा:- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/९१४/२०१७ दि.२८/११/२०१७
२. श्री कडूस, ग्रामसेवक यांचा खुलासा दिनांक २६/१२/२०१७
३. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.ग्रापं-३/११४३/२०१८ दिनांक २९/१०/२०१८.
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्र.विशा-४/खाचौ/सी.आर/३२६/२०१८, दिनांक २५/०६/२०१९
५. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क साप्रवि-२/ग्रापं-६/८११/२०१९ दि.३०/०८/२०१९.
६. श्री पी.एस.कडूस, ग्रामसेवक यांचा खुलासा दिनांक ०६/०९/२०१९
७. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१११५/२०१९ दि.२९/११/२०१९
८. अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अपिल क्र.८२/२०२४ मधील निकाल दिनांक २४/०२/२०२५.
९.अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र. डिईएन-२०२६/प्र.क्र.३८/आस्था-१२ दिनांक ०७/०७/२०२६ समवेत मा.राज्यमंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचेकडील अपील आदेश दिनांक ०३/०७/२०२६.

श्री प्रदीप सुदाम कडूस, हे तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत किन्ही,ता.पारनेर येथे कार्यरत असतांना त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशान्वये श्री कडूस पी. एस. यांना पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल, अशारितीने एक वर्षासाठी थोपविणे ही शिक्षा अंतीम करण्यात आलेली होती.

श्री प्रदीप सुदाम कडूस, तत्कालीन ग्रामसेवक यांनी इकडील संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशा विरुध्द अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्र. ८ अन्वये श्री कडूस यांचे सदरचे अपील अमान्य करण्यात आल्याने शिक्षेचे आदेश कायम केलेला आहे.

उक्त नमुद शिक्षेचा आदेश व अपर आयुक्ताचे निकालाचे अनुषंगाने श्री.कडूस यांनी मा.राज्यमंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी होवून संदर्भ क्र.९ च्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दिनांक ०३ जुलै २०२६ या कार्यालयास दिनांक ०६/०८/२०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

१. अपिलार्थी श्री प्रदीप सुदाम कडूस, ग्रामसेवक यांचे अपील मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याचे दि.२९.११.२०१९ रोजीचे आदेश व

अपर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचे दि.२४.०२.२०२५ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. अपिलार्थी यांची जुनी वेतनवाढ नियमित करुन त्यांना सर्व सेवातंर्गत लाभ,वेतनाची थकबाकी व नियमानुसार मिळणारे आर्थिक फायदे त्वरीत अदा करण्यात यावेत.

सदर आदेशाची नोंद श्री प्रदीप सुदाम कडूस, हे तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत किन्ही,ता.पारनेर यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२५१०१८०६०१६२ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-10-2026 14:35:28
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री प्रदीप सुदाम कडूस, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत किन्ही,ता.पारनेर

द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर.

२/- सदरचा आदेश श्री.कडूस यांना बजावणेत येवून दिनांकीत पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेण्यात येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्यप्रत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत:- कार्यासन-०१/०२,ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर